श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.८/२०२६ **दिनांक ०३/११/२०२६**

स्थळ- जिल्हा न्यायालय,अहिल्यानगर **वेळ- सकाळी ११.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०३.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२८९०/२०२६ दि.३०.१०.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०३.११.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

मा.श्री. शिवाजी कचरे,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

विषय नं.१ दि.०१.०९.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.४०० दि.०१.०९.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही- सभा कामकाज विभाग)

विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर, श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साई आश्रम भक्तनिवास व श्री साईबाबा भक्तनिवास या परिसरामध्ये साईभक्तांचे सुविधेकरीता व त्यांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होण्यासाठी टेंन्साईल फॅब्रीकचे छत असलेले शेडस् उभारणेबाबत.

निर्णय क्र.४०१/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

२. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नव्याने कॅन्सर डे-केअर सेंटर सुरु करणेसाठी बांधकाम विषयक कामे करणेकरीता प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.४०१/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

३. संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन, मंदिर विभागासाठी माहे सप्टेंबर २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी साखर खरेदी कामी फेर ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४०१/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

४. श्री साई मंदिर हरिव्दार, ग्रेटर नोएडा व रघुबीर नगर, दिल्ली येथे श्रींच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०१/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

५. सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, स्वच्छता, पेस्ट कंन्ट्रोल फॉगींग, स्वच्छता कामे आऊटसोर्स ठेकेदाराकडून आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०१/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवास)

---

६. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींगचे कामकाज आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी स्वच्छता कर्मचारी व वैद्यकीय पेशाशी संलग्न असणारे कर्मचारी पुरविणे बाबतची ई-निविदा फेर प्रकाशित करणेबाबत.

निर्णय क्र.४०१/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

७. मुखेड वसंतनगर व गोरटे, जि.नांदेड, पंचलाई पारडी (वलसाड), तसेच अहमदाबाद (सोला), सुरत, वडोदरा, कणकवली सिंधुदुर्ग, उरण जि.रायगड, गोवा, कोतवडे-रत्नागिरी, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक येथे श्रींच्या पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०१/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

८. नांदेड जिल्हातील वसंतनगर व गोराडे या प्रस्तावित भ्रमण मार्गास जोडून देगलूर आणि नायगाव, जि.नांदेड येथे श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०१/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

९. सन २०२६-२७ करीता संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेकामी प्राप्त ई-निविदांपैकी निम्नतम L-1दरधारक मे.सी.आय.एस.एस.सर्व्हिसेस लि., मुंबई यांना कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.४०१/९ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

१०. संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने व रुग्णालये इमारत येथील सोलर हॉट वॉटर सिस्टीम बायबॅक करुन त्या ठिकाणी हिट पंप यंत्रणा बसविणेकामी निम्नत्तम दरधारक मे.साई एजन्सी, शिर्डी यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४०१/१० चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.३ श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे वास्तव्य अधिक सोयीचे होऊन येथे भक्तांचा ओघ वाढावा यासाठी आध्यात्मिक कॉरीडोर विकसीत करणे, रस्ते विकास व सुशोभीकरण कामांचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणेसाठी सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबत.

निर्णय क्र.४०२ Skyline Infraworld Pvt. Ltd., Lucknow या कंपनीने सादर केलेली निविदा तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या योग्य वाटत असली, तरी सदर कंपनीने तदर्थ समितीसमोर केलेले सादरीकरण समाधानकारक वाटले नाही.

सदर कंपनीच्या प्रतिनिधींनी प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिलेली नाही, आवश्यक मोजमापे घेतलेली नाहीत, तसेच देवस्थानच्या प्रत्यक्ष गरजा व आवश्यकता यांचा योग्य प्रकारे विचार न करताच प्रकल्पाचे सादरीकरण ऑनलाईन

केलेले आहे. त्यामुळे सदर सादरीकरणामध्ये प्रकल्पस्थळाची वस्तुस्थिती, उपलब्ध परिस्थिती आणि संस्थानच्या विशिष्ट गरजा यांचे योग्य प्रतिबिंब दिसून आले नाही. अशा परिस्थितीत सदर कंपनीकडे इतक्या महत्त्वाच्या प्रकल्पाचे काम सोपविणे संस्थानच्या हिताचे ठरणार नाही.

याशिवाय, प्रस्ताव क्रमांक ३ अंतर्गत प्रस्तावित असलेल्या काही कामांचा समावेश प्रस्ताव क्रमांक ७ मध्येही करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्ताव क्रमांक ३ मधील कामाच्या मूळ कार्यव्याप्तीत मोठया प्रमाणात बदल होत आहे. अशा परिस्थितीत मूळ कार्यव्याप्तीच्या आधारे मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता देणे उचित ठरणार नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता, विशेषतः प्रत्यक्ष स्थळपाहणी, आवश्यक मोजमापे आणि देवस्थानच्या गरजांचे योग्य मूल्यमापन न करता केलेले असमाधानकारक सादरीकरण, तसेच कामाच्या कार्यव्याप्तीत होत असलेला महत्त्वपूर्ण बदल विचारात घेता, प्रस्ताव क्रमांक ३ मंजूर करणे संस्थानच्या व्यापक हिताचे ठरणार नाही.

सबब, प्रस्ताव क्रमांक ३ नामंजूर करण्यात येत आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.४ **श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूस असलेल्या खुले नाटयगृहाचे समोरील जागेत साई भक्तांचे सुविधेकरीता टेंन्साईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत.**

निर्णय क्र.४०३ जमीन मागणीच्या संदर्भात जो पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे त्याबाबत पाठपुरावा करुन फेर प्रस्ताव सादर करावा. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

विषय नं.५ **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान मंदिरासमोरील तळघरात असलेले CCTV Control Room नवीन दर्शनरांगेमध्ये स्थलांतरीत करणे व त्याकरीता आवश्यक इंटेरीअर व फर्निचरची कामे करणेसाठी येणारे रक्कम रु.३७,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४०४ **नियोजित ठिकाणी स्टॉंग रूम चे बांधकाम सुरक्षित राहिल असा स्पष्ट अहवाल प्रशासनाने सादर करावा. तांत्रिक व सुरक्षा तपासणी अहवाल देतेवेळी पोलीस विभाग, अग्निशमन विभाग व त्या क्षेत्रातील तज्ञ संस्थेची मदत घेणे उचीत होईल. तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.६ **व्दारावती भक्तनिवास येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील खोल्यांचे रंगकाम करणेकामाचे ठेकेदार बी.आर.आनंद, छ.संभाजीनगर यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

निर्णय क्र.४०५ द्वारावती भक्तनिवास येथील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील खोल्या व पॅसेजच्या रंगकामास झालेल्या विलंबाबाबतचा प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात आला.

प्रस्तावाचे अवलोकन करता, संबंधित ठेकेदाराकडून काम पूर्ण करण्यास ५५ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येते. निविदेतील अटीनुसार प्रतिदिन रु.२,०००/- प्रमाणे एकूण रु.१,१०,०००/- दंड आकारणी प्रस्तावित आहे.

तथापि, सदर कालावधीत श्री रामनवमी उत्सव व इतर कार्यक्रमांमुळे काही दिवस रंगकामासाठी खोल्या उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. तसेच रंगकामासाठी आवश्यक जागा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात आल्याने काम पूर्ण करण्यास विलंब झाल्याचे प्रशासनाच्या अहवालावरून दिसून येते.

या परिस्थितीत विलंबाची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर टाकणे उचित होणार नाही. तथापि, काम विहित मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी ठेकेदाराची असल्याने संपूर्ण दंड माफ करणेही योग्य ठरणार नाही.

त्यामुळे निविदेतील संबंधित अटी व सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार यांची पडताळणी करून प्रस्तावित रु.१,१०,०००/- दंडापैकी ५० टक्के म्हणजे रु.५५,०००/- दंड आकारण्यात यावा आणि उर्वरित रु.५५,०००/- दंड माफ करण्यात यावा.

तसेच काम पूर्ण करण्यास झालेला विलंब विचारात घेऊन, संबंधित कामासाठी दिनांक ०२/०९/२०२६ पर्यंत कार्योत्तर मुदतवाढ मंजूर करण्यात यावी.

दंडाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून किंवा नियमानुसार उपलब्ध असलेल्या अन्य रकमेतून वसूल करण्यात यावी.

सदर निर्णयामुळे ठेकेदारास अन्य कोणत्याही करारभंगाबाबत सूट मिळणार नाही.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.७ **शिर्डी येथील श्री साईबाबा परिक्रमा मार्गाचे रुंदीकरण (९.०० मी.) करुन डांबरीकरण करण्यासाठी येणा-या खर्चास रक्कम रु.६१.०९ कोटी मात्रचे खर्चास तसेच सदर प्रकल्पाकरीता सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.**

निर्णय क्र.४०६ सदर प्रस्तावाचा विचार करता, श्री साईबाबा परिक्रमा मार्गाचे ९ मीटर रुंदीकरण व डांबरीकरण करून एकूण १०.५० कि.मी. लांबीचा रस्ता विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे रुपये ६१.०९ कोटी इतका खर्च अपेक्षित असल्याचे नमूद आहे.

प्रस्ताव क्रमांक ३ अंतर्गत Skyline Infraworld Pvt. Ltd., Lucknow यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव तदर्थ समितीने नामंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सदर कंपनीची प्रस्ताव क्रमांक ७ अंतर्गत प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करणे उचित होणार नाही.

सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च मोठया प्रमाणावर असल्याने प्रकल्पाची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता, कामाची निश्चित व्याप्ती आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचे योग्य मूल्यमापन होणे आवश्यक आहे. प्रस्तावित रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये ज्या शेतक-यांच्या जमीनी जात आहेत त्याचे सर्वेक्षण करावे, हद्दी निश्चीत करण्यात याव्यात, सर्वेक्षणानुसार ज्या शेतक-याचे क्षेत्र जात आहे त्या क्षेत्राचे त्यांचेकडून दानपत्र घेण्यात यावे तसेच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश करावा.

त्यामुळे प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ, संबधीत शेतक-यांचे दानपत्र व ताबा आणि त्यासाठी अपेक्षित खर्च आणि संपूर्ण प्रकल्पाचा एकूण आर्थिक भार याबाबत स्पष्ट अभिप्राय प्राप्त करणे आवश्यक आहे.

सबब, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :

१. **प्रस्ताव क्रमांक ७ अंतर्गत Skyline Infraworld Pvt. Ltd., Lucknow यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत नाही.**

२. **प्रस्तावित परिक्रमा मार्गाच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जमिनीचे क्षेत्रफळ, दानपत्र व जमीनीचा ताबा, प्रकल्पासाठीचा अंदाजित खर्च आणि संपूर्ण प्रकल्पाची आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यता याबाबत सविस्तर अहवाल प्राप्त करण्यात यावा.**

३. **प्रकल्पाची निश्चित कार्यव्याप्ती व आर्थिक व्यवहार्यता स्पष्ट झाल्यानंतरच प्रकल्प सल्लागार नियुक्तीसाठी नियमानुसार नव्याने प्रस्ताव सादर करावा.**

तोपर्यंत प्रस्ताव क्रमांक ७ अंतर्गत प्रकल्पास अंतिम मान्यता देण्याबाबतचा निर्णय प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.८ **साई आश्रम भक्तनिवास येथील ओपन ॲम्पिथिएटर व स्टेजकरीता नवीन डिझाईनप्रमाणे संपूर्ण भागात टेंन्साईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणेस व त्यानुसार वाढीव क्षेत्रफळामुळे होणारा रु.४३,१०,०१०/-मात्रचा वाढीव खर्च या प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या खर्चातून करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४०७ सदर प्रस्तावाचा विचार करता, साई आश्रम भक्तनिवास येथील ओपन ॲम्फीथिएटर व स्टेजकरिता टेन्साईल फॅब्रिकचे छत उभारण्याच्या कामास तदर्थ समितीने सन २०२४ मध्येच प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकही तयार

करण्यात आले होते. तथापि, जानेवारी २०२६ पर्यंत सदर कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नव्हती.

त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असता, कामाच्या मूळ स्वरूपात काही बदल सुचविण्यात आले. त्यानुसार सुधारित आराखडा तयार करण्यात आल्याने कामाच्या परिमाणात वाढ होऊन रुपये ४३,१०,०९०/- इतका अतिरिक्त खर्च अपेक्षित असल्याचे प्रस्तावात नमूद आहे.

वास्तविक, एखाद्या विकासकामास तदर्थ समितीने मान्यता दिल्यानंतर प्रशासनाने त्या कामाची निविदा प्रक्रिया व इतर आवश्यक कार्यवाही विनाविलंब पूर्ण करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रस्तुत प्रकरणात सन २०२४ मध्ये मान्यता मिळालेली असतानाही निविदा प्रक्रिया राबविण्यास झालेला विलंब योग्य वाटत नाही. अशा विलंबामुळे कामाच्या खर्चात वाढ होण्याची तसेच मंजूर प्रकल्पाची अंमलबजावणी अनावश्यकपणे लांबणीवर पडण्याची शक्यता असते.

तथापि, सदर कामाची आवश्यकता, सुधारित आराखड्यानुसार कामाच्या परिमाणात झालेली वाढ आणि त्यासाठी अपेक्षित अतिरिक्त खर्च विचारात घेता, संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांनी सुधारित परिमाणे व खर्चाची पडताळणी केली असल्याच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता देणे उचित वाटते.

सबब, सदर प्रस्तावास खालील अटी व निर्देशांसह मान्यता देण्यात येत आहे :

१. सुधारित आराखड्यानुसार कामाच्या परिमाणात झालेली वाढ आणि त्यासाठी अपेक्षित रुपये ४३,१०,०९०/- इतक्या अतिरिक्त खर्चास, संबंधित सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांच्या पडताळणीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०२४ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही जानेवारी २०२६ पर्यंत निविदा प्रक्रिया का राबविण्यात आली नाही, याची कारणे तपासावीत व भविष्यात अशा प्रकारचा विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. यापुढे तदर्थ समितीने कोणत्याही विकासकामास मान्यता दिल्यानंतर प्रशासनाने आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय कार्यवाही, निविदा प्रक्रिया आणि कार्यादेश देण्याची प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी.

४. मंजूर विकासकामांच्या अंमलबजावणीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमित देखरेख ठेवावी. कोणत्याही कारणास्तव कामास विलंब होत असल्यास त्याची कारणे नोंदवून आवश्यक उपाययोजना कराव्यात.

५. समितीच्या मान्यतेनंतर कामाच्या स्वरूपात किंवा खर्चात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास त्याची कारणे, तांत्रिक आवश्यकता आणि आर्थिक परिणाम स्पष्ट करून सक्षम प्राधिकरणाची आवश्यक पूर्वमान्यता घेण्यात यावी.

६. सदर काम नियमानुसार व विनाविलंब पूर्ण होण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील निर्देशांसह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.९ **नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या वाहतूक सुविधेच्या दृष्टीने संस्थानतर्फे अहिल्यानगर - मनमाड रस्त्याच्या पूर्व बाजूस असलेली चारी क्र.११ बंदिस्त करुन साईनगर रेल्वे स्टेशनकडे जाणा-या प्रस्तावित पोहोच रस्त्यापर्यंतचा रस्ता विकसीत करण्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.७.०० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४०८ प्रस्तावित सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने अहिल्यानगर–मनमाड रस्त्यापासून साईनगर रेल्वे स्थानकाकडे जाणारा पोहोच रस्ता विकसित करण्यासाठी रु.७ कोटी खर्चाचा प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावामध्ये सविस्तर अंदाजपत्रक, आराखडे तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून पी. आर. कन्सल्टिंग इंजिनिअर्स LLP, पुणे यांची प्रकल्प किमतीच्या १.१०% अधिक GST या दराने नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

विषय नं.१० **नाशिक-त्र्यबंकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या वाहतूक सुविधेसाठी संस्थानतर्फे साईनगर रेल्वे स्टेशन, शिर्डी येथून दक्षिणबाजूचा चारी क्र.११ पर्यंतचा रस्ता विकसीत करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.१,७७,३७,७३९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४०९ नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने साईनगर रेल्वे स्थानकापासून चारी क्रमांक ११ पर्यंतचा पोहोच रस्ता विकसित करण्यासाठी रु.१,७७,३७,७३९/- खर्चाचा प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावात पी. आर. कन्सल्टिंग इंजिनिअर्स LLP, पुणे यांची सविस्तर अंदाजपत्रक, आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून प्रकल्प किमतीच्या १.१०% अधिक GST या दराने नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संस्थानकडे स्वतंत्र बांधकाम विभाग असल्यामुळे या कामासाठी सल्लागाराची आवश्यकता दिसून येत नाही.

उर्वरीत प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

विषय नं.११ कुंभमेळा नियोजनाच्या अनुषंगाने शिर्डी शहरातील विविध विकास कामांसाठी रु.२८.५० कोटी निधी संस्थानकडून उपलब्ध करुन देणेकामी मुख्याधिकारी, शिर्डी नगर परिषद यांचे पत्राबाबत.

निर्णय क्र.४१० प्रस्तावित विकासकामांचा विचार करता, आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची संभाव्य मोठी संख्या लक्षात घेऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी, वाहतूक नियोजनासाठी, पादचारी मार्ग, सार्वजनिक स्वच्छता, वाहनतळ आणि गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक असलेली जी कामे प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे अशा कामांचे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद यांनी समितीपुढे सादरीकरण करावे.

त्यामुळे प्रस्ताव स्थगीत करण्यात येत आहे. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.१२ श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास परिसरामध्ये साचणा-या पावसाचे पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी शिर्डी-नांदुर्खी शिव हद्दीवरुन १२०० मी.मी.व्यासाचे दोन आर.सी.सी.पाईप टाकून त्यावर डांबरीकरणामध्ये रस्ता विकसीत करण्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.८.०० कोटी मात्रचा निधी शिर्डी नगरपरिषद यांना उपलब्ध करुन देणेविषयी शिर्डी नगरपरिषद यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.

निर्णय क्र.४११ सदर प्रस्तावाचा विचार करता, श्री साईनाथ रुग्णालय व द्वारावती भक्तनिवास परिसरात पावसाळ्यात मोठया प्रमाणात पाणी साचत असल्याने रुग्णालयात येणारे रुग्ण, साईभक्त तसेच स्थानिक नागरिक यांची गैरसोय होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी प्रस्तावित आर.सी.सी.पाइपलाइन टाकणे व त्यावर रस्ता विकसित करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

सदर कामासाठी शिर्डी नगरपरिषदेने रुपये ८ कोटी इतक्या निधीची मागणी केली आहे. प्रस्तावित कामामुळे संस्थानच्या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची तसेच द्वारावती भक्तनिवासात राहणाऱ्या साईभक्तांची गैरसोय दूर होणार असल्याने सदर काम सार्वजनिक हिताचे व आवश्यक स्वरूपाचे आहे.

तथापि, सदर कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा लागणार असल्याने संस्थानचा निधी योग्य कारणासाठी व पारदर्शक पद्धतीने खर्च होणे आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण निधी एकाच वेळी नगरपरिषदेस उपलब्ध करून देण्याऐवजी प्रत्यक्ष कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने निधी वितरित करणे उचित राहील.

सबब, शिर्डी नगरपरिषदेच्या सदर प्रस्तावास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तत्त्वतः मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तावित कामासाठी रुपये ८ कोटींच्या कमाल मर्यादेत निधी उपलब्ध करून देण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात येत आहे. तथापि, निधी वितरित करण्यापूर्वी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तसेच राज्य शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकरणांची आवश्यक मान्यता प्राप्त करण्यात यावी.

२. शिर्डी नगरपरिषदेने प्रस्तावित कामाचे सविस्तर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, मंजूर आराखडा आणि कामाच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक संस्थानकडे सादर करावे.

३. सदर कामाची निविदा प्रक्रिया शिर्डी नगरपरिषदेने प्रचलित नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने राबवावी. निविदा प्रक्रिया, कार्यादेश व मंजूर खर्च यांची माहिती संस्थानकडे सादर करावी.

४. संपूर्ण निधी एकाच वेळी उपलब्ध करून देण्यात येऊ नये. प्रत्यक्ष बांधकामाची प्रगती, पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप आणि संबंधित सक्षम अभियंत्याचे प्रमाणपत्र यांची पडताळणी करूनच टप्प्याटप्प्याने निधी वितरित करण्यात यावा.

५. प्रत्येक टप्प्यातील निधी वितरित करण्यापूर्वी नगरपरिषदेने यापूर्वी प्राप्त निधीच्या विनियोगाचा तपशील, पूर्ण झालेल्या कामाचे मोजमाप पुस्तिकेतील संबंधित उतारे, कामाच्या प्रगतीचा अहवाल आणि आवश्यक छायाचित्रे संस्थानकडे सादर करावीत.

६. संस्थानच्या बांधकाम विभागातील सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून कामाची प्रगती व गुणवत्ता यांची खात्री करावी. त्यानंतरच पुढील टप्प्यातील निधी वितरित करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

७. मंजूर कामाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कामासाठी सदर निधीचा वापर करण्यात येऊ नये. तसेच संस्थानच्या पूर्वमान्यतेशिवाय कामाच्या मूळ स्वरूपात किंवा मंजूर खर्चात बदल करण्यात येऊ नये.

८. सदर काम नियोजित कालावधीत पूर्ण करण्याची तसेच काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित पाइपलाइन व रस्त्याची नियमित देखभाल आणि दुरुस्ती करण्याची संपूर्ण जबाबदारी शिर्डी नगरपरिषदेची राहील. याबाबत नगरपरिषदेकडून लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

९. काम पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषदेने काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, अंतिम खर्चाचा तपशील व निधी विनियोग प्रमाणपत्र संस्थानकडे सादर करावे. निधीची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती संस्थानकडे परत करण्यात यावी.

वरील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रस्तावास तत्त्वतः मान्यता देण्यात येत आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.१३ **शिर्डी शहराच्या उत्तरेकडील नाला क्र.३४ चे प्रीकॉस्ट आर.सी.सी.(RCC) बॉक्स कल्व्हर्ट बांधकामाव्दारे पुनर्विकास करुन वाहनतळ सुविधा विकासासाठी सविस्तर आराखडा (Detailed Design) आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) सेवा देण्याकरीता सल्लागार नियुक्ती करणे कामाचे निम्नतम फी दराचे ई-आरएफपी प्रस्ताव सादरकर्ते मल्टिमिडीया कन्सल्टंट प्रा.लि.अहमदाबाद यांचा प्रकल्प किंमतीच्या ०.८५%+GST या फी दराचा प्रस्ताव स्विकारुन त्यांना नेमणूक आदेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

निर्णय क्र.४१२ प्रस्ताव तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.१४ **नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ कालावधीत भाविकांचे सुविधेकरीता वाहतुक व्यवस्थेसाठी संस्थानतर्फे नाला क्र.३२ लगतचा रस्ता ते कनकुरी रोडपर्यंतचा रस्ता रुंदीकरण करुन विकसीत करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

निर्णय क्र.४१३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.१५ **नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ कालावधीत भाविकांचे सुविधेकरीता वाहतुक व्यवस्थेसाठी श्री साईबाबा संस्थानतर्फे नगर-मनमाड रोड (हॉटेल सनराज जवळ) ते शिर्डी बायपास रोडपर्यंतनाला क्र.३२ लगतचा रस्ता रुंदीकरण करुन विकसीत करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

निर्णय क्र.४१४ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.१६ **श्री साईबाबा संस्थानचे सर्व्हे नं.१०९ मधील जुने कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कूलच्या इमारतीचे तळमजला, पहिला व दुस-या मजल्यावर श्री साईनाथ रुग्णालय/डॉर्मीटरी सुरु करणेकरीता आवश्यक सिव्हील कामे करणेसाठी येणारे रक्कम रु.४३,६१,३१४/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४१५ श्री साईबाबा संस्थानच्या सर्व्हे नं. १०९ मधील जुन्या कन्या विद्यामंदिर व इंग्लिश मीडियम स्कूलच्या इमारती या संस्थानच्या दोन भक्तनिवासांच्या मध्यभागी आहेत. शिर्डी येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक वाहनांद्वारे दर्शनासाठी येत असून, दररोज अंदाजे ७०० ते ८०० वाहने भाविकांना घेऊन येतात. अशा वाहनांच्या चालकांसाठी विश्रांती व निवासाची पुरेशी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ही बाब विचारात घेऊन सदर शाळांच्या इमारतींचा उपयोग वाहनचालकांसाठी डॉर्मिटरी सुविधा निर्माण करण्याकरिता करता येईल काय, याबाबत प्रस्ताव सादर करण्याची सूचना अध्यक्ष महोदयांनी केली होती.

तथापि, प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य इमारती व कॅन्टीन इमारतीच्या नूतनीकरणाच्या अनुषंगाने रुग्णालयाची ओपीडी व काही जनरल वॉर्ड सदर शाळांच्या इमारतीमध्ये तात्पुरते स्थलांतरित करून त्यानंतर डॉर्मिटरी सुविधा सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे.

अध्यक्ष महोदयांनी प्रस्ताव मागविण्यामागील मूळ उद्देश वाहनचालकांसाठी डॉर्मिटरी सुविधा निर्माण करणे हा होता. मात्र प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव मुख्यत्वे रुग्णालयाच्या विभागांच्या तात्पुरत्या स्थलांतराशी संबंधित असल्याचे दिसून येते.

शिवाय, श्री साईनाथ रुग्णालयाच्या मुख्य इमारती व कॅन्टीन इमारतीच्या नूतनीकरणासाठी निविदा प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे, प्रत्यक्ष काम केव्हा सुरू होणार आहे आणि त्यासाठी रुग्णालयाचे विभाग स्थलांतरित करणे सध्या आवश्यक आहे काय, याबाबत प्रस्तावात स्पष्ट माहिती नाही.

त्यामुळे प्रशासनाने अध्यक्ष महोदयांनी सुचविलेल्या मूळ उद्देशाचा विचार करून सदर इमारतींमध्ये वाहनचालकांसाठी डॉर्मिटरी सुविधा निर्माण करण्याच्या व्यवहार्यतेबाबत स्वतंत्र व सविस्तर प्रस्ताव सादर करावा. त्यामध्ये उपलब्ध जागा, वाहनचालकांची अपेक्षित संख्या, निवासक्षमता, आवश्यक मूलभूत सुविधा, अंदाजित खर्च व सदर सुविधेच्या व्यवस्थापनाबाबत स्पष्ट माहिती असावी.

तसेच रुग्णालयाच्या विभागांचे तात्पुरते स्थलांतर करणे आवश्यक असल्यास त्याची स्वतंत्र कारणमीमांसा, नूतनीकरणाच्या कामाची सद्यस्थिती आणि स्थलांतरासाठी अपेक्षित कालावधी याबाबतही अहवाल सादर करावा.

वरील बाबींचा सविस्तर अहवाल व मूळ उद्देशानुसार सुधारित प्रस्ताव प्राप्त होईपर्यंत सदर रु.४३,६१,३१४/- खर्चास मंजुरी देण्याबाबतचा निर्णय स्थगित ठेवण्यात येत आहे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.१७ शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगी स्वरुपात प्राप्त १२१ ऑईल कॅनव्हास पेंटिग्ज् (साईज८'x५') करीता ॲक्रेलिक ग्लास, ३'' पी.व्ही.सी.पाईप डिझाईन फ्रेम व मागील बाजूस १२ एम.एम.जाडीचे वॉटरप्रुफ प्लायवुडसह फ्रेमिंग करुन नवीन दर्शनरांगेच्या हॉलचे भिंतींवर बसविणेकरीता येणारे रक्कम रु.२८,५५,६००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४१६ श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी श्री साई सच्चरित्रातील विविध घटनांवर आधारित १२१ तैलचित्रे श्री साईबाबा संस्थानला भेटस्वरूपात देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर चित्रे नवीन दर्शनरांगेतील भिंतींवर लावण्यासाठी रु. २८,५५,६००/- खर्चाचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

सदर चित्रे भाविकांना श्री साईबाबांचे जीवनचरित्र, त्यांची शिकवण व श्री साई सच्चरित्रातील विविध प्रसंग समजण्यासाठी उपयुक्त ठरणे अपेक्षित आहे. तथापि, सदर चित्रे श्री साई सच्चरित्रातील वर्णनानुसार आहेत किंवा नाहीत, याबाबत संस्थानच्या प्रकाशन विभागाने पडताळणी केल्याचे प्रस्तावातून दिसून येत नाही.

त्यामुळे सदर १२१ चित्रे संस्थानच्या प्रकाशन विभागामार्फत तपासून घेण्यात यावीत. प्रत्येक चित्र श्री साई सच्चरित्रातील कोणत्या अध्यायातील व कोणत्या प्रसंगाशी संबंधित आहे, चित्रातील प्रसंगाचे वर्णन मूळ साई सच्चरित्राशी सुसंगत आहे किंवा नाही, तसेच त्यातून भाविकांना संबंधित प्रसंगाचा योग्य अर्थ व संदेश समजेल किंवा नाही, याची खात्री करण्यात यावी.

आवश्यकतेनुसार प्रत्येक चित्राखाली संबंधित अध्यायाचा संदर्भ व प्रसंगाची थोडक्यात माहिती मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत देण्याबाबतही विचार करण्यात यावा. तसेच चित्रांच्या मालकीहक्कासह पुनर्मुद्रण व डिजिटल वापराचे अधिकार संस्थानकडे कायदेशीररीत्या हस्तांतरित होत असल्याची खात्री करण्यात यावी.

वरीलप्रमाणे प्रकाशने विभागाचा सविस्तर अभिप्राय व पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच चित्रे नवीन दर्शनरांगेतील भिंतींवर लावण्यासाठी प्रस्तावित रु.२८,५५,६००/- खर्चास मंजुरी देण्याबाबत पुढील निर्णय घेण्यात यावा.

तोपर्यंत सदर खर्चाच्या प्रस्तावावरील निर्णय स्थगित ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

विषय नं.१८ पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस, सिलेंडर व TCCA-90 ब्लिचींग पावडर खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४१७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-खरेदी विभाग)

विषय नं.१९ सन २०२६-२७ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनाची ताटे साफ करणेकरीता डिश वॉशिंग लिक्वीड खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४१८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साई प्रसादालय)

विषय नं.२० संस्थानचे जावक विभागाकडील दैनंदिन टपाल फ्रॅकिंग करुन पोस्टाने पाठविणेकामी नवीन अद्ययावत फ्रॅकिंग मशिन खरेदी करणे व सध्याचे IJ-90 (License ID No.N100544) फ्रॅकिंग मशिन बायबॅक करणेबाबत.

निर्णय क्र.४१९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२१ श्री साईबाबांच्या जीवन कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष/विभाग गठीत करणेबाबत.

निर्णय क्र.४२० प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२२ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील कलम २१(२)(दोन) च्या परंतुकानुसार मा.शासनाकडून नियुक्त छाननी समिती अध्यक्ष यांना श्रींचे दर्शन व आरतीकरीता संस्थान ओळखपत्र देणेबाबत.

निर्णय क्र.४२१ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२३ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार १)श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता, औद्योगिक प्रशिक्षण संस्था २)श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) ३)श्री.प्रकाश दादा क्षीरसागर, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) यांचे समग्र चौकशीबाबत.

निर्णय क्र.४२२ समितीसमोर सादर केलेला प्रस्ताव, यापूर्वी समितीने घेतलेले निर्णय, संबंधित न्यायालयीन कार्यवाही व विभागाचा अभिप्राय विचारात घेण्यात आला.

समितीने यापूर्वीच संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत समग्र विभागीय चौकशी करण्याचा स्पष्ट निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे प्रशासनावर बंधनकारक होते. तथापि, श्री. अमृत गंगाधर जगताप यांच्याबाबत चौकशीची कार्यवाही सुरू असताना श्री. नवनाथ भाऊसाहेब कोते व श्री.प्रकाश दादा क्षीरसागर यांच्याबाबतची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात आल्याचे प्रस्तावावरून दिसून येते.

समितीच्या स्पष्ट निर्णयानंतरही प्रशासनाने त्याची तातडीने अंमलबजावणी न करता श्री. अशोक पाटील यांचे कायदेशीर मत मागविले. सदर मत मागविण्याची आवश्यकता व त्यामुळे झालेल्या विलंबाचे समाधानकारक स्पष्टीकरण प्रस्तावात देण्यात आलेले नाही.

प्रशासनाच्या या कार्यपद्धतीमुळे समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी अनावश्यकरीत्या लांबविण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते व श्री. प्रकाश दादा क्षीरसागर यांच्याविरुद्धची चौकशी टाळण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका निर्माण होते. ही बाब गंभीर असून समिती त्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करते.

श्री. सुभाष दुसाने यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती होऊनही चौकशी अपेक्षित गतीने पूर्ण झालेली नाही. त्यामुळे चौकशीचे कामकाज कार्यक्षमतेने व निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी चौकशी अधिकारी बदलणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.

त्यामुळे समिती खालीलप्रमाणे ठराव करते :

१. संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध समग्र चौकशी करण्याचा समितीचा पूर्वीचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. सदर निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

२. श्री. अमृत गंगाधर जगताप, श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते व श्री. प्रकाश दादा क्षीरसागर यांच्याबाबत उपलब्ध आरोप, अभिलेख व पुराव्यांच्या आधारे लागू सेवा विनियमांनुसार चौकशी करण्यात यावी.

३. विद्यमान चौकशी अधिकारी श्री. सुभाष दुसाने यांच्याकडून चौकशी पूर्ण होण्यास झालेला विलंब आणि अपेक्षित प्रगतीचा अभाव लक्षात घेऊन, त्यांना चौकशी अधिकारी पदाच्या जबाबदारीतून मुक्त करून त्यांच्या जागी सक्षम, अनुभवी व निष्पक्ष नवीन चौकशी अधिकारी नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येते. याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने लागू विनियमांनुसार आवश्यक आदेश निर्गमित करावेत.

४. नवीन चौकशी अधिकाऱ्याकडे सर्व संबंधित कागदपत्रे, आरोपपत्रे, पुरावे, पूर्वीच्या चौकशीचे अभिलेख व न्यायालयीन आदेश तातडीने सुपूर्द करण्यात यावेत. यापूर्वी कायदेशीररीत्या नोंदविण्यात आलेली कार्यवाही विनाकारण पुन्हा करण्यात येऊ नये.

५. नवीन चौकशी अधिकाऱ्याने संपूर्ण अभिलेख प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करून आपला कारणासहित अहवाल सक्षम शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे सादर करावा. संबंधित कर्मचाऱ्यांना नियमानुसार बचावाची पूर्ण संधी देण्यात यावी.

६. चौकशीच्या प्रगतीचा दर पंधरा दिवसांनी आढावा घेण्यात यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशीसाठी आवश्यक अभिलेख, कर्मचारी व प्रशासकीय साहाय्य उपलब्ध करून द्यावे.

७. समितीच्या पूर्वीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास झालेल्या विलंबाबाबत, तसेच श्री. अशोक पाटील यांचे कायदेशीर मत मागविण्याच्या आवश्यकतेबाबत सविस्तर लेखी स्पष्टीकरण समितीसमोर सादर करावे.

वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२४ श्रीमती मनिषा कैलास शेजवळ, रा.शिर्डी यांनी मुंबई उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन नं.५५७२/२०२५ ला अनुसरुन मा.न्यायालयाने दि.२८ जुलै, २०२६ रोजी दिलेल्या निर्णयाबाबत.

निर्णय क्र.४२३ श्रीमती शेजवळ यांनी सन २०१३ मध्ये अर्ज केलेला आहे. सन २०१३ ते २०२२ पर्यंत त्यांना नियुक्ती का देण्यात आली नाही या संदर्भातील अहवाल समितीपुढे सादर करावा. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२५ श्री. दत्तात्रय सुधाकर डहाळे, प्र.वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा, यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.४२४ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२६ श्री. सतिष रघुनाथ जेजुरकर, मदतनीस, श्री साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.४२५ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२७ श्री. किरण दिगंबर जाखडी, कुपन विक्रेता, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.४२६ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२८ श्री विरभद्र काच मंदिर, शिर्डी-बिरोबा बन, येथील श्री विरभद्र महाराज यात्रेतील कुस्ती हगाम्याकरीता रक्कम मंजुर होणेबाबत.

निर्णय क्र.४२७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.२९ संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील रिक्त स्थायी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कायमस्वरुपी भरणेबाबत.

निर्णय क्र.४२८ समितीसमोर सादर करण्यात आलेला प्रस्ताव विचारात घेण्यात आला.

तदर्थ समितीच्या दिनांक ०७.०७.२०२६ रोजीच्या ठराव क्रमांक २७५ अन्वये संस्थानच्या विविध विभागांतील रिक्त पदे ११ महिन्यांच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर भरण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात आले व प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली.

छाननी समितीने संबंधित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याचा निष्कर्ष नोंदविल्याचे प्रस्तावात नमूद आहे. मात्र, कोणत्या उमेदवारास कोणत्या कारणास्तव अपात्र ठरविण्यात आले, याचा तपशील व छाननी समितीची मूळ फाईल समितीसमोर सादर करण्यात आलेली नाही.

तसेच, संबंधित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फतच भरणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले असले, तरी त्यासाठी कोणत्या विशिष्ट कायदेशीर तरतुदीचा किंवा शासन आदेशाचा आधार घेण्यात आला आहे, याबाबत प्रस्तावात स्पष्टता नाही.

अशा परिस्थितीत छाननी समितीच्या निष्कर्षांची मूळ अभिलेखावरून पडताळणी केल्याशिवाय पूर्वीच्या ठरावानुसार सुरू केलेली पदभरती प्रक्रिया रद्द करण्याबाबत अंतिम निर्णय घेणे उचित होणार नाही.

त्यामुळे खालीलप्रमाणे ठराव करण्यात येतो :

१. सदर प्रस्तावावरील अंतिम निर्णय तूर्त राखून ठेवण्यात येतो.

२. प्राप्त अर्जांच्या छाननीसंबंधी संपूर्ण मूळ फाईल, छाननी समितीचे कार्यवृत्त, पदनिहाय पात्रता निकष, प्राप्त अर्जांची यादी आणि प्रत्येक उमेदवारास अपात्र ठरविण्याची कारणे यांसह सर्व संबंधित कागदपत्रे पुढील सभेत समितीसमोर सादर करण्यात यावीत.

३. संबंधित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फतच भरणे बंधनकारक असल्यास त्यासंबंधी विशिष्ट कायदेशीर तरतूद, सेवाप्रवेश विनियम किंवा शासन आदेश यांचा स्पष्ट उल्लेख करून प्रशासनाने सविस्तर खुलासा सादर करावा.

४. सदर अभिलेखांची पडताळणी होईपर्यंत दिनांक ०७.०७.२०२६ रोजीच्या ठराव क्रमांक २७५ अन्वये सुरू केलेली पदभरती प्रक्रिया रद्द करण्याचा कोणताही निर्णय स्थगित ठेवण्यात येत आहे.

५. वरील सर्व कागदपत्रे व खुलासा १५ दिवसांच्या आत समितीसमोर सादर करण्यात यावा.

वरीलप्रमाणे ठराव करण्यात येतो.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.३० साईभक्तांमार्फत Online Services व्दारे आरक्षित केलेल्या आरती पास सुविधा रद्द केल्यास सुविधेच्या आरक्षणापोटी जमा झालेल्या रकमेपैकी ७५ टक्के रक्कम साईभक्तांना परत करणेबाबत.

निर्णय क्र.४२९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

विषय नं.३१ संस्थानचे कार्यान्वीत संगणकीय नेटवर्कमध्ये आढळून आलेल्या Ransomware virus चे प्रादुर्भावाचे अनुषंगाने करणेत येत असलेल्या व करावयाचे कार्यवाहीबाबत.

निर्णय क्र.४३० प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

विषय नं.३२ M/s cloaktech Solution Pvt.Ltd., Bangalore या कंपनीला संस्थानचे नवीन दर्शनरांग इमारतीच्या ब्रीजखाली डिजीटल लगेज लॉकर या प्रयोजनार्थ वापरावयास दिलेल्या मोकळया जागेच्या वापरास मुदतवाढ देण्याबाबत.

निर्णय क्र.४३१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३३ संस्थानचे नवीन दर्शनरांग इमारतीतील पहिल्या मजल्यावरील गाळा नं.७ व दुस-या मजल्यावरील गाळा नं.१२ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना खाद्य पदार्थ व थंडपेय विक्री या प्रयोजनार्थ वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३२ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.३४ श्री.अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तू, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थान मालकीची मौजे निमगाव को-हाळे येथील साईप्रसादालय इमारतीतील ७२०० चौ.फुट बांधीव जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेली असून सदर जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत तसेच प्रदर्शन पाहणी शुल्कात वाढ करणेबाबत.

निर्णय क्र.४३३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

विषय नं.३५ जमीन दान स्वरूपात स्विकारणेबाबत.

निर्णय क्र.४३४ टायटल व्हेरिफिकेशन प्रथम घेण्यात यावे व त्यानंतर फेर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३६ मौजे शिर्डी, ता. राहाता येथील सर्व्हे नं.१९५/४ पै. व सर्व्हे नं.१९५/५ मधील ०.२० आर क्षेत्र रस्त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी कायम खरेदी घेणेबाबत.

निर्णय क्र.४३५ सदर जमिनीमध्ये जाण्यासाठी सध्या जो रस्ता आहे त्याबद्दल खात्री करुन प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३७ आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांना भगवद्गीता वितरणासाठी स्टॉल/गाळयाच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३६ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३८ महानगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्सच्या धर्तीवर खादी ग्रामोद्योग भांडार स्थापन करणेसाठी संस्थान परिसरात गाळा उपलब्ध करुन देणेबाबत स्टेट डायरेक्टर खादी ग्रामोद्योग आयोग,मुंबई-२० यांचेकडील दि.१५.१०.२०२६ रोजीचे पत्र.

निर्णय क्र.४३७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

विषय नं.३९ संस्थानचे साई धर्मशाळा येथील 380 KLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) चे तुलनात्मक माहितीसह फेरसादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४३८ प्रशासनाकडून असे नमुद करण्यात आले की, दुरुस्तीनंतर सदर प्रकल्प १० ते १२ वर्ष सुस्थितीत चालू शकतो, त्यामुळे प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

विषय नं.४० श्री दत्त जयंती उत्सव-२०२६ करीता पालखीव्दारे येणारे पालखी पदयात्री साईभक्तांसाठी मुंबई ते शिर्डी या मार्गावर संस्थानतर्फे पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणेबाबत.

निर्णय क्र.४३९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)

विषय नं.४१ श्री साई प्रसादालय व साई आश्रम येथील आय.टी.विभागाचे डाटा सेंटरचे जुने प्रेसिजन ए.सी.यंत्रणा बायबॅक करुन नवीन यंत्रणा बसविणे कामी येणा-या खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४० जुन्या यंत्रांचा उपयुक्ततेबाबत तज्ञ व्यक्तींकडून अहवाल घेण्यात यावा. त्यानंतर फेर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४२ साईबाबा भक्तनिवासस्थान करीता नवीन लॉकर्स खरेदी करणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४३ नवीन दर्शनरांग इमारतीतील FBS (Full Body Scanner) व BS (Baggage Scanner) यांचे दोन वर्षाचे कालावधीकरीता कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.

निर्णय क्र.४४२ प्रस्ताव मंजूर. सर्व यंत्रणा चालू असल्याची खात्री करुन घेण्यात यावी.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४४ साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा भक्तनिवास करीता लोखंडी कॉट खरेदी कामी M/s Rajmudra Insfrastructure, Sangamner यांना दिलेल्या कार्यादेश नुसार कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४५ संस्थानचे विविध ठिकाणचे जुने स्प्लिट ए.सी.बायबॅक करुन नवीन ए.सी.खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दरधारक मे.साई HVAC सिस्टीम, ठाणे यांना कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४४ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४६ संस्थानचे समाधी मंदिर व परिसर, कार्यालय, भक्तनिवासस्थाने, दोन्ही रुग्णालये व इतर ए.सी.यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम दरधारक मे.एम.के.इंजिनिअरिंग, नवी दिल्ली यांना कार्यादेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४५ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४७ रूग्णालय लॉन्ड्री युनिट करीता नवीन मशिनरी खरेदी करणेकामी प्राप्त निविदेतील निम्नत्तम दरधारक मे.श्री सत्यानारायण कंपनी, मुंबई यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४६ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४८ नविन दर्शन कॉम्प्लेक्स येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) चे वार्षिक ऑपरेटींग व मेन्टेनंन्स (AMC) देणेकामी निम्नत्तम दरधारक यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४७ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

विषय नं.४९ श्री साईबाबा हॉस्पिटल येथे स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्तापित करणेकामी प्रकल्प ठेकेदार मे.काहाळे इन्फ्राकॉन प्रा.लि., चंद्रपुर यांना मुदतवाढ देणे तसेच सदर प्रकल्पाकरीता आवश्यक अग्निशमन यंत्रणेकरीता पाण्याचे टाकीचे फाऊंडेशन रचनेतील बदलाबाबत फेर सादर .

निर्णय क्र.४४८ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)

विषय नं.५० मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे दि.२८-०९-२०२६ रोजीचे मान्यतेनुसार श्री साईबाबा संस्थानचे २३ नग पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी निम्नतम दर निविदाधारक मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, छत्रपती संभाजीनगर यांनी चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेले अंतिम दर रक्कम रु.६७,००,०००/- (सर्व करासहित) इतके दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४४९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.५१ मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे लॉण्ड्री इमारतीचे पहिल्या मजल्यावरील कॅन्सर डे केअर युनिटचे विद्युतीकरण कामाकरीता निम्नतम दर निविदाधारक मे.ध्रुव इलेक्ट्रिकल्स, राहूरी यांनी चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेले अंतिम दर रक्कम रु.३६,५०,०००/- (सर्व करांससहीत) मात्र इतके दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५० प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

विषय नं.५२ साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता, पेस्ट कंन्ट्रोल फॉगींग इ. दुरुस्ती व दखभालीचे कामाकरीता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५१ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास/विधी विभाग)

विषय नं.५३ साई आश्रम भक्तनिवास विभागाकडील जुने कॉट अभिलेख कक्ष विभागाकडील निरुपयोगी भंगार वस्तुंचे विक्रीचे मंजूर दराने विक्री करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५२ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)

विषय नं.५४ साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशित २३ पुस्तकांचे पुर्नमुद्रण करुन पुरवठा करणेकामी वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारकांना कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.४५३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

विषय नं.५५ संस्थानला सोने वस्तु वितळविणेसाठी मान्यता मिळालेले सोने दागिने इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळविणे व पूर्वीचे मंजूर सोने नाणी तयार करुन घेणेची संख्या सुधारित करणे व जादा येणारे खर्चाबाबत.

निर्णय क्र.४५४ प्रस्ताव मंजूर. नाण्याचे वजनामध्ये जो बदल करण्यात आलेला आहे त्याचे मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.५६ माहे ऑगस्ट-२०२६ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.४५५ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)

विषय नं.५७ आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवुन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४५६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- लेखाशाखा)

विषय नं.५८ गृहमंत्रालय भारत सरकार (FCRA) यांचे अधिसूचने अंतर्गत संस्थेस लागू विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करणेबाबत.

निर्णय क्र.४५७ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- लेखाशाखा)

विषय नं.५९ दि.०१.०७.२०२६ ते दि.३०.०९.२०२६ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.४५८ धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

विषय नं.६० श्री साईबाबांच्या विचारांचा व संस्थानच्या सेवा कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी श्री साई सोशल मिडीया संमेलनाचे आयोजन करणेबाबत.

निर्णय क्र.४५९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

विषय नं.६१ श्री साईबाबांच्या मानवतावादी व सेवाभावी जीवनकार्याचा परिचय देश-विदेशातील संत, महंत, भाविक आणि समाजापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने 'भव्य वैश्विक संत संमेलन' आयोजीत करणेबाबत.

निर्णय क्र.४६० तहकुब.

(कार्यवाही- जनसंपर्क विभाग)

विषय नं.६२ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) आणि संस्थान यांच्या मधील सामंजस्य कराराबाबत.

निर्णय क्र.४६१ प्रस्ताव मंजूर. इतर राज्यांसोबत चर्चा करुन ज्या ज्या राज्यांसोबत एमओयु होऊ शकतो अशा राज्यांचा सविस्तर प्रस्ताव समितीसमोर सादर करावा.

(कार्यवाही- जनसंपर्क विभाग)

विषय नं.६३ मंदिर परिसरात अधिकृत छायाचित्र सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.४६२ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- जनसंपर्क विभाग)

विषय नं.६४ टुल्स, इक्विपमेंट, इन्ट्रयुमेंट साहित्य खरेदीकामी न्युनतम पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.४६३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

विषय नं.६५ महाराष्ट्र शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act,2009) अंतर्गत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये मोफत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिपुर्तीच्या रकमेबाबत.

निर्णय क्र.४६४ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत पाठपुरावा करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल)

विषय नं.६६ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने सह-शालेय उपक्रम राबविणेसाठी नवीन शैक्षणिक संकुलामधील शाळांच्या वाढविण्यात आलेल्या दैनंदिन कामकाजाच्या वेळेबाबत.

निर्णय क्र.४६५ नोंद घेतली.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल)

विषय नं.६७ संस्थान संचलित शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढविण्यासाठी व आर्थिक सहाय्यासाठी 'विद्यार्थी कमवा व शिका योजना' सुरु करणेबाबत.

निर्णय क्र.४६६ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय)

विषय नं.६८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, तसेच On Consignment Basis वरील साहित्य इ. खरेदीकामी दर निश्चिती (Rate Contract) करणेकामी प्रथम ई-निविदेस अनुसरुन ज्या मटेरिअलकरीता पुरवठा आदेश देण्यात आलेले नाहीत अशा मटेरीयलकरीता फेर ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४६७ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.६९ श्री साईनाथ रुग्णालयातील कॅन्सर डे केअर सेंटरकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे औषधे (Tablet/ Injection) खरेदी करणेकामी कमर्शिअल ई-निविदेतील निम्नतम दरधारकांशी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४६८ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७० श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील वैद्यकीय अधिकारी, पब्लीक रिलेशन मॅनेजर व एस.टी./ एच.ए. फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट यांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकांचा कालावधी संपुष्टात आलेनंतर टप्प्या-टप्प्याने पुन्हा नेमणूका देणेबाबत.

निर्णय क्र.४६९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७१ संस्थान रुग्णालयात पदव्युत्तर (PG) विद्यार्थ्यांची प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक करणेबाबत.

निर्णय क्र.४७० डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांना श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून संलग्न करण्याबाबतचा प्रस्ताव समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आला.

सदर प्रस्तावामुळे संस्थानच्या रुग्णालयांतील रुग्णसेवा अधिक सक्षम होण्यास मदत होऊ शकते. तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होईल.

मात्र, सदर प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ तसेच अन्य सक्षम प्राधिकरणांच्या नियमांनुसार आवश्यक मान्यता व परवानग्या असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

त्यामुळे सदर प्रस्तावास तत्त्वतः मान्यता देण्यात येत असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी प्रशासनाने पुढील बाबींची पूर्तता करावी.

१. प्रस्तावित प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक मान्यता व परवानग्यांची खात्री करावी.

२. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी संस्थानच्या पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीच रुग्णसेवेशी संबंधित काम करावे. रुग्णांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची वैद्यकीय जबाबदारी, व्यावसायिक विमा, शिस्तभंगविषयक कार्यवाही तसेच रुग्णांच्या तक्रारींचे निवारण याबाबत सामंजस्य करारात स्पष्ट तरतुदी कराव्यात.

४. सदर प्रशिक्षणामुळे संस्थानवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही याची खात्री करावी. भोजन व अन्य सुविधांबाबतची जबाबदारी स्पष्ट करावी.

५. प्रस्तावित सामंजस्य कराराची कायदेशीर तपासणी करून आवश्यक दुरुस्त्या कराव्यात.

६. वरील बाबींची पूर्तता झाल्यानंतर विषय धोरणात्मक बाब असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी व ती प्राप्त केल्यानंतरच सामंजस्य कराराची अंमलबजावणी करावी.

वरील अटींच्या अधीन राहून प्रस्तावास तत्त्वतः मान्यता देण्यात येत आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७२ कंत्राटी बालरोग तज्ञांना कंत्राटी फिजिशियन यांचेप्रमाणे मासिक मानधन देणेबाबत.

निर्णय क्र.४७१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७३ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लेबर ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने ऑप्ट्रोमेट्री टेक्निशियन नेमणूकीबाबत.

निर्णय क्र.४७२ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७४ Advance Three Chip Full HD System with Ureteroscope चे पुरवठा करणेस (Delivery period) मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.४७३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७५ संस्थानचे कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१,८३,६७८/-मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

निर्णय क्र.४७४ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७६ श्रीमती निशा मधुकर बारसे, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.४७५ नोंद घेतली. (कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७७ डॉ.सुभाष शामकुंवर, सेवानिवृत्त व डॉ.दादासाहेब कांबळे यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल रिट पिटीशन क्र.११७१९/२०१७ मधील निकालाबाबत.

निर्णय क्र.४७६ विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन आवश्यकता असल्यास पुन्हा समितीपुढे प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७८ महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम,२०१९ सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची (१०,२० व ३०) सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभाबाबत.

निर्णय क्र.४७७ प्रस्तावातील 'अ' बाबत शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रस्तावातील 'ब' मंजूर आणि 'क' बाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.७९ श्री साईबाबा रुग्णालयातील सेवानिलंबीत कार्डियोलॉजिस्ट यांना संस्थान सेवेतून बडतर्फ करणेबाबत.

निर्णय क्र.४७८ तहकुब. या संदर्भाने वेळोवेळी मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाचे झालेल्या आदेशांचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.८० व्हिजीटिंग बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकारी यांना दिपावली सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत.

निर्णय क्र.४७९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

विषय नं.८१ श्री साईबाबा संस्थानमार्फत २०० बेडचे कॅन्सर हॉस्पिटल सुरु करणेबाबत व त्याकरीता वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.

निर्णय क्र.४८० सध्या कार्यरत शासकीय कॅन्सर हॉस्पिटलमधील उपलब्ध डॉक्टर्स आणि स्टाफ यांची माहिती संकलीत करुन समितीपुढे सादर करण्यात यावी.

(कार्यवाही-श्री साईनाथ रुगणालय)

विषय नं.८२ श्री साईनाथ रक्तकेंद्रामध्ये रक्तदान करणा-या प्रत्येक रक्तदात्यास आर.ओ.पाणी बॉटल उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.४८१ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- श्री साईनाथ रुगणालय)

विषय नं.८३ श्रींचे रथ/पालखी मार्गावरील थांब्यांच्या ठिकाणी दर्शनव्यवस्था बंद करुन केवळ आरत्या करणेबाबत.

निर्णय क्र.४८२ तहकुब.

(कार्यवाही-संरक्षण विभाग)

विषय नं.८४ गेट नंबर ५ हे कायमस्वरुपी बंद करणेबाबत.

निर्णय क्र.४८३ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- संरक्षण विभाग)

विषय नं.८५ मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१०७२४/२०२४ मध्ये मा.न्यायालयाने दि.२३.१०.२०२६ रोजी पारीत केलेल्या निर्णयाबाबत.

निर्णय क्र.४८४ मा.अध्यक्ष यांनी प्रशासनाच्या पत्राला जे उत्तर दिलेले आहे त्या अनुषंगाने अहवाल समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.८६ श्री. संजय बाबासाहेब कोते, मदतनीस, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांची कर्करोग (कॅन्सर) आजाराची रजा मंजूर करणेबाबत.

निर्णय क्र.४८५ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

विषय नं.८७ श्री साईबाबा शैक्षणिक संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये आयोजित होणा-या (१४ वर्षाखालील मुले व मुली) शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेकामी मंडप, स्टेज, बैठक व्यवस्था व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी ठेकेदार न्यू रोशनी मंडप ॲन्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.४८६ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

विषय नं.८८ संस्थानमार्फत साईभक्तांसाठी प्रस्तावित विविध विकासकामे व आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ निमित्त प्रस्तावित कामांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आऊटसोर्स ठेकेदाराकडील कार्यरत अभियंत्यांना मानधन तत्वावर घेणेबाबत.

निर्णय क्र.४८७ तहकुब.

(कार्यवाही-कामगार विभाग)

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगी आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.१ श्री साईबाबा महाविद्यालयाकरीता स्थायी प्राचार्य पद भरतीकामी निवड समितीचे गठण करणे व मुलाखतीची दिनांक निश्चित करणे.

निर्णय क्र.४८८ प्रस्ताव मंजूर. विद्यापीठाने जी नावे सुचविलेली आहे, त्यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांच्या उपलब्धतेबाबत खात्री करावी व त्यानंतर फेर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.२ श्री साईनाथ रुग्णालय परिसरात केसपेपर इमारत बांधकामाचे ठेकेदार मे.अजित कुमार जैन, गोंदिया यांचे प्रकल्पाचे कामास मुदतवाढ मागणीबाबत.

निर्णय क्र.४८९ प्रस्ताव मंजूर. दंड न आकारता मुदतवाढ देण्यात येत आहे.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.३ **LIC कडून प्राप्त होणा-या निधीचा वापर करुन श्री साईबाबा रुग्णालयातील विद्यमान Casualty विभागाचे आधुनिक Modular Casualty Unit मध्ये रुपांतर करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदेस अनुसरुन प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

निर्णय क्र.४९० **प्रस्ताव मंजूर.**

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

आयत्या वेळेचा

विषय नं.४ **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८०/८५ मधील साई प्रसादालय परिसराचे तसेच मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ मधील श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवासचे वाढीव इलेक्ट्रीक लोडकरीता सबस्टेशन व जनरेटर इमारत या दोन इमारतींचे बांधकामासाठी येणारे अंदाजे एकूण रु.२.७५ कोटी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

निर्णय क्र.४९१ **प्रस्ताव मंजूर.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.५ **गाईचे शुध्द तुपाचे देयके अदायगीबाबत.**

निर्णय क्र.४९२ **प्रस्ताव मंजूर.**

(कार्यवाही-खरेदी विभाग)

आयत्या वेळेचा

विषय नं.६

निर्णय क्र.४९३ मा.उच्च न्यायालय, मुंबई व खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने बाजू मांडणेसाठी संस्थानचे पॅनलवर ॲड.श्री.बी.बी. येनगे, ॲड.श्री.प्रताप विखे, ॲड.श्री.अमेय अभय शिरसीकर व ॲड.श्री.शामसुंदर पाटील यांचा समावेश करणेत यावा.

(कार्यवाही-विधी विभाग)

वरील निर्णय क्र.४०० ते ४९३ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायं.४.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत-
(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

स्वाक्षरीत-
(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

स्वाक्षरीत-
(शिवाजी कचरे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.